


हस व हसम...











१. देव आनंदसह हाऊस नं. ४४मध्ये

२. चाची ४२० (कमल हासन) सह जॉनी वॉकर

३. जॉनी लिव्हर अक्षयकुमारसह जानवर चित्रपटात

फिल्मिलेनियम २०००

'हसा आणि हसवा' हे सूत्र अंगी बाणवून पडद्यावर आपली यशस्वी कारकीर्द गाजवणारे, कॉमेडीला गांभीर्याने घेणारे हे कलाकार. आपल्या व्यक्तिगत दुःखांचा विसर पाडून लोकांना तीन तास खळखळत हसवत ठेवणाऱ्या विनोदवीरांची ही गाथा...

□ राजेश श्रीवास्तव


हिंदी चित्रपटांमध्ये कॉमेडी थोडी उशीरा आली. १९३२ साली *लाल सवार* व *भाई हीरो* नामक चित्रपटांद्वारा घोरी व दीक्षित नामक कॉमेडियन प्रथमच पडद्यावर आले. या चित्रपटात त्यांनी केलेल्या कॉमेडीवर लोक खूप हसलेही होते त्यामुळे घोरी व दीक्षित यांना अनेक चित्रपटात कामे मिळाली. *भोला शिकार*, *मिस १९३३*, *कृष्ण सुदामा*, *विश्वमोहिनी* आणि *नादिरा* सारखे पंचवीस- तीस चित्रपट या जोडीने केले. घोरी व दीक्षितनंतर गोप, चार्ली, देसाई यांचा काळ आला. यातील गोप लोकांना अजूनही आठवतोय.

हिंदी सिनेमातील पहिला कॉमेडी चित्रपट होता, *एक्सक्युज मी सर*. हा चित्रपट फक्त तीनच रिळांचा होता. पण हा संपूर्णतया विनोदी चित्रपटच होता. लोकांनी या चित्रपटाचे खूप कौतुक केले आणि न्यू थिएटर्सने पहिलावहिला कार्टूनपट बनवला, *थ्री ब्रदर्स इन मूनलाईट*. यात कथा-पटकथा व संगीत होते आर. सी. बोराल यांचे.


आज कॉम्प्युटर ग्राफिक्समुळे कार्टून्स बनवणे खूप सोपे व वेगाचे काम आहे पण त्याकाळी ते तितके सोपे मुळीच नव्हते. न्यू थिएटर्सच्या या कार्टूनपटाने तुफान लोकप्रियता मिळवल्यावर प्रभात फिल्म्सने *झम्मुका* नामक एक विनोदीपट बनवला. मग चित्रपटात कॉमेडीचा प्रवेश सोपा झाला. सामाजिक, ऐतिहासिक व धार्मिक चित्रपटांमध्ये मुद्दाम अशी हास्यदृश्ये लिहून घेतली जाऊ लागली. यामुळे विनोदवीरांना कामे मिळू लागली.

यानंतर विनोदवीरांची मोठीच रांग लागली. जी आजपर्यंत अविरत सुरू आहे. ओमप्रकाश, जॉनी वॉकर, मुक्री, आगा, राधाकिशन, भगवान, सुंदर, याकूब, कन्हैयालाल, मेहमूद, टुनटून, मोहन चोटी, ज्युनियर मेहमूद, राजेंद्रनाथ, जगदीप, प्रीती गांगुली, असरानी, पेंटल, देवेन वर्मा, गुड्डी मारूती, कादर खान, शक्ती कपूर, राकेश बेदी, सतीश शाह, अशोक सराफ, लक्ष्मीकांत बेर्डे व जॉनी लिव्हर असे कित्येक विनोदवीर हिंदीत आले. यातील कित्येक चरित्र अभिनेत्यांमधून हीरोतून नि व्हिलनमधून विनोदवीर बनले. प्रत्येकाची वेगवेगळी शैली असल्याने सर्वांना सारखेच यश कधीच मिळाले नाही. या विनोदवीरांव्यतिरिक्त किशोरकुमार, अमिताभ बच्चन व गोविंदा यासारख्या कलाकारांनी आपल्या चित्रपटात स्वतःच कॉमेडी केल्याने त्यांच्या चित्रपटात कॉमेडियनच्या वाट्याला फारसे काही येत नसे. विनोदवीरात श्रेष्ठ म्हणावे अशी नावे फारच थोडी आहेत. यात सर्वात अग्रणी नावे ठरली ती जॉनी वॉकर व मेहमूद यांची. या दोघांनी विनोदवीरांना हीरोच्या पातळीवर आणून ठेवले.

१९४० साली तेरा जणांचे कुटुंब घेऊन बद्रुद्दीन काझी इंदोरहून मुंबईला आले. सुरूवातीला बस कंडक्टरची नोकरी व इतरही अनेक छोटे व्यवसाय करून बद्रुद्दीन काझी कुटुंबाचे पोट भरत होते. पण चित्रपटात काम करण्याची इच्छा मनात घर करून होतीच. कुणा मित्राच्या सल्ल्याने ते चित्रपटात एक्स्ट्राची कामे करू लागले. असे करता करता *आखरी पैगाम*मध्ये त्यांना मोठी भूमिका मिळाली. मात्र बद्रुद्दीन काझीचा जॉनी वॉकर


१


२


३

१. ओमप्रकाश

२. *चलती का नाम गाडी*मध्ये किशोरकुमार-मधुबाला

३. शुभा खोटेबरोबर मेहमूदची जोडी जमली.

बनला १९५१ साली. गुरूदत्तच्या बाजी या चित्रपटात त्यांना मोठी संधी मिळाली. नूर महंमद चार्लीच्या कॉमेडीचे चाहते असणाऱ्या जॉनी वॉकरनी *संजोग, अंगारे* व *कारदार* यांचा सवेरा चित्रपट फक्त नूर महंमद चार्लीसाठीच पाह्यले.

याच जॉनी वॉकरचा स्वतःचा एक काळ आला. या काळात त्यांच्यासाठी खास संवाद व गीते लिहिली जात. महंमद रफी सारखे गायक जॉनी वॉकरच्या शैलीत गीते गाऊ लागले. तो काळ दिलीपकुमार, राज कपूर, देव आनंद या त्रयीचा होता. पण जॉनी वॉकरनी या तिघांसमोरही उत्तम टक्कर दिली. मात्र या तिघांबरोबर त्यांचे संबंध वाईट नव्हते.

आणखी एक कॉमेडियन राधाकिशन जॉनीला खूप आवडे. खास करून त्याची संवादाची शैली. जॉनीचे आणखी एक लाडके होते ओमप्रकाश. ओमप्रकाश जॉनी वॉकरला खरे तर खूप ज्येष्ठ. जॉनी वॉकर ओमप्रकाश यांची आठवण काढतात तेव्हा आजही त्यांचे डोळे पाणावतात. "मी त्यांना अनेक रंगात रंगताना पाह्यलेय. प्रत्येक रंगात ओमजी कमालच करत. त्यांचे *जाली नोट* व *चरणदास* चित्रपट मला तुफान आवडले होते. त्याकाळात आणखी एक खलनायक वजा कॉमेडियन होते कन्हैयालाल. त्यांच्या अभिनयात जी सहजता होती ती अजबच. असित सेन यांनीही एक काळ गाजवला. बंगाली ढंगात अगदी धीम्या गतीने संवाद म्हणण्याची शैली कमालीची करमणूक करीत असे." असे इतर विनोदवीरांचेही कौतुक निखालसपणे करणारे जॉनी वॉकर *मधुमती* व *शिकार* चित्रपटात पुरस्कार विजेते विनोदवीर ठरले. *प्यासा*मधले त्यांचे तेल मालिश वाल्याचे पात्र आजही कुणी विसरलेला नाहीय. जॉनी वॉकरना स्वतःलाही आपली *प्यासा*मधील तेलमालिशवाला व *नया दौर*मधील फोटोग्राफर ही पात्रे खूप आवडतात. जॉनी वॉकर यांची वाढती लोकप्रियता लक्षात घेऊन १९५७ साली नटराज प्रॉडक्शनने *जॉनी वॉकर* नावानेच एक चित्रपट काढला. यात जॉनी वॉकर व श्यामा यांच्या महत्त्वाच्या भूमिका होत्या.

हळूहळू हृषिदा, बासूदा व गुलजार यांचा जमाना आला. त्यांच्या चित्रपटांमध्ये धर्मेंद्र, अमिताभ व अमोल पालेकर सारखे नायकच स्वतः कॉमेडी करू लागले. पण त्या काळातही कॉमेडियन पडद्यापासून दूर फेकला गेला होता असे नाही. या विशिष्ट दिग्दर्शकांच्या चित्रपटाचा स्थायीभावच विनोदी असल्याने यात चमकणाऱ्या प्रत्येकाला कॉमेडी करावी लागत होती. या काळात राजेंद्रनाथ, देवेन वर्मा, केश्तो मुखर्जी यांचा वरचष्मा होता. यात देवेन वर्मांच्या कॉमेडीचा स्तर नेहमी वरचा असे. म्हणून गुलजार यांनी संजीवकुमारची दुहेरी भूमिकावाल्या *अंगूर* चित्रपटात दुसऱ्या दुहेरी भूमिकेकरता देवेन वर्मांची निवड केली होती.

तसे हिंदी चित्रपटात कॉमेडियनचे स्थान क्रिकेटमधील बाराव्या खेळाडूसारखेच असे. अनेकदा संकलनाच्या टेबलावर आधी कात्री लागे ती विनोदवीरालाच. अशा काळातही टिकून राहू शकले ते मेहमूद. मेहमूदनी एक काळ अक्षरशः गाजवला. कमी शिकलेला तरी खूप विकला गेलेला हा कॉमेडियन तेव्हा जणू स्टारच होता. सातव्या इयत्तेत जाईपर्यंत चौदा शाळा बदलणारे मेहमूद वयाच्या आठव्या वर्षापासूनच अभिनयात उतरले. त्यावेळी बॉम्बे टॉकीजच्या *किस्मत* फिल्मीस्तानच्या *शिकारी* व *सोना चांदी*त त्यांनी बालकलाकार म्हणून काम केलेले. तरीही अभिनयात त्यांना विशेष रूची होती असे म्हणता येणार नाही. पण घरची आर्थिक स्थिती बेताची असल्याने वाट्याला येईल ते काम ते करत होते. कधी भरत व्यास व पी. एल. संतोषी यांचा *ड्रायव्हर* तर पी. एल. संतोषी व अरविंद देसाईंचा सहाय्यक अशी कामे मेहमूद करत होते. तर कधी कमलेश सहगल यांच्यासारख्या कलादिग्दर्शकाकडेही सहाय्यक म्हणून त्यांनी काम केले. त्याकाळात हीरा सिंग यांनी देव आनंद व मधुबाला अभिनित *नादान*मध्ये मेहमूदना बस कंडक्टरच्या छोट्या पण महत्त्वाच्या भूमिकेत काम करायला लावले. ७५ रूपयांची नोकरी करणाऱ्या मेहमूदना चार दिवसांच्या चित्रीकरणाचे चारशे रूपये मिळाले आणि अभिनय काही वाईट नाही असे त्यांना वाटू लागले. पण *नादान*नंतर ते बेकारच राह्यले.

त्यावेळी त्यांची बहीण मीनू मुमताज स्टार झाली होती. बहिणीच्या कमाईवर घर चालत होते त्यामुळे घरात मेहमूदना अगदी खालमानेनेच जगावे लागत होते. पण सुरूवातीपासून अशा आर्थिक व मानसिक विवंचना सहन केलेल्या मेहमूदनी लोकांना कसे हसवले? असे विचारता ते उत्तरतात, जमीनीशी पाळेमुळे जोडून असलेला माणूस जितका सहज नि वास्तव अभिनय करू शकतो तितका ऐषारामात वाढलेला माणूस करू शकत नाही. ऐषारामात वाढलेल्याला तुमची वेदना कशी कळणार?


चार्ली, गोप, आगा, असित सेन, मारूती यासारखे कलाकार आपले आगळे वेगळे स्थान निर्माण करून विनोदवीराची कर्तव्ये चित्रपटात बजावत होते. मात्र परस्परांविषयी ईर्षा न बाळगता एकमेकांचा आदरही ही मंडळी करत







होती. मेहमूदना पहिली मोठी व महत्त्वपूर्ण संधी *सीआयडी*त मिळाली ती जॉनी वॉकर यांच्या मुळेच. यानंतर मेहमूदनी राज कपूर यांच्यासह *परवरिश* केला. हे दोन्ही चित्रपट खूप गाजले व मेहमूदचे स्थान हिंदी चित्रपटात अढळ झाले.



*छोटी बहन*मध्ये मेहमूद प्रथम हीरो बनले. त्यात त्यांची नायिका होती शुभा खोटे. मेहमूदनी अनेक नायिकांबरोबर नायकाची भूमिका केली पण त्यांची जोडी खऱ्या अर्थाने जमली ती शुभा खोटेबरोबर. नंतर अरूणा ईराणीबरोबरही त्यांनी जोडी बनवली.

कॉमेडीत वेगवेगळ्या छटा आणणाऱ्या आणि हैदराबादी, काश्मिरी व गुजराती सहित वेगवेगळ्या भाषांचा वापर करून कॉमेडियन रंगवणाऱ्या मेहमूद यांचा आदर्श कॉमेडियन मात्र किशोरकुमार होते. म्हणूनच *पडोसन*, *बॉम्बे टू गोवा*, *साधू और शैतान* सारख्या आपल्या अनेक चित्रपटात त्यांनी किशोरकुमारना घेतले होते. किशोरकुमारचे चाहते असणारे मेहमूद देवेन वर्मांनाही उत्कृष्ट विनोदवीर मानतात.

मेहमूद यांच्या स्वतःच्या आवडता चित्रपट *पारस*. दुसऱ्यांना पोट धरून हसायला लावणारा हा विनोदवीर स्वतः किती दुःखे झेलीत असेल याचे उदाहरण त्यांच्या स्वतःच्या अनुभवावर आधारित असणाऱ्या *कुंवारा बाप* चित्रपटात दिसते.



टुनटुन



असित सेन

स्थूलकायता कॉमेडीसाठी पर्याय

हिंदी चित्रपटात प्रासंगिक विनोदाबरोबरच स्थूलकाय कॉमेडियननी कॉमेडीचे प्रतिनिधीत्व केले. टुनटून, गोप, असित सेन, पोल्सन, प्रीती गांगुली व गुड्डी मारूती ही त्यांचीच उदाहरणे.



पोल्सन



भगवानदादा



गुड्डी मारूती

या महाकाय कॉमेडियनची सुरूवात गोप व टुनटुन यांच्यापासूनच झाली. टुनटून हरियाणातून मुंबईत आली ती गायिका बनायला. नौशादनी तिला *दर्द* चित्रपटात 'अफसाना लिख रही हूं' गाणे गायला लावले. हे गाणे खूप लोकप्रिय झाले. मग कारदार स्टुडियोत महिना पाचशे रूपये वेतनावर ती काम करू लागली. *दर्द*, *अफसाना*, *बाबूल*, *दिल्लगी*, *नाटक*, *अनोखी अदा* व *झीनत* सारख्या कित्येक चित्रपटात तिने पार्श्वगायन केले. "पण नंतर पार्श्वगायनाची कामे मिळणे बंद झाले. दरम्यान संसाराची जबाबदारी अंगावर पडली. चूल पेटवणे मुश्कील झाले तेव्हा नौशादनी दया येऊन *बाबूल*मध्ये कॉमेडी भूमिका मला दिली. यावेळी माझे नाव उमादेवी बदलून टुनटून झाले व ते कायमचे चिकटले." टुनटून स्वतः सांगत होत्या.

दादामुनी अशोककुमारांची कन्या प्रीती गांगुली चित्रपटात कॉमेडी करायला आली नाही पण स्थूलकायेमुळे इतर भूमिका मिळेनात शेवटी कॉमेडी भूमिकांवरच तिला समाधान मानावे लागले. मधल्या काळात कॉमेडीच्या साच्यातून बाहेर पडायला मोठ्या कष्टाने तिने वजन कमी केले. पण दुर्दैवाने तिला कामच मिळेनासे झाले. पुन्हा तिने वजन वाढवले व कामात ती सतर्क झाली.

प्रीती गांगुलीची रिप्लेसमेंट म्हणून गुड्डी मारूतीला विनोदी भूमिकात घेतले जाऊ लागले. विजय आनंद यांच्या *जान हाजीर है*मध्ये छोटीशी भूमिका केलेली गुड्डी शिक्षणात यथातथाच म्हणून हास्य अभिनेते वडील मारूती यांनी तिला चित्रपटातच आणले. चंदर सदानांच्या *सौ दिन सास के*मध्ये गुड्डीने प्रीतीची भूमिका केली व ती प्रीतीची कायमची रिप्लेसमेंट बनली. असेच स्थूलकायेमुळे विनोदी नट बनलेले पोल्सन, गोप हे होते. त्यात गोप अग्रेसर ठरले. त्यांचे *पतंगा*मधील 'मेरे पिया गये रंगून' हे गाणे आजही लोकांना आठवते. पोल्सननेही सुमारे दिडेकशे चित्रपटात कामे केली. भगवान दादा, असित सेन हे विनोदी कलाकार स्थूल कायेमुळे हिट झाले असे म्हणता येणार नाही. त्यांच्या विशिष्ट लकबीने ते विनोदवीर म्हणून गाजले. भगवान दादांनी निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता, कॉमेडियन, स्टंटमन, कोरियोग्राफर व लेखक अशी चतुरस्र कामगिरी हिंदी चित्रपटात केली. हिंदीबरोबरच भगवानदादा मराठी, गुजराती, तामिळ व पंजाबी चित्रपटांमध्येही चमकले. असित सेन *आराधना*, *कटीपतंग*, *दुश्मन*, *अनुराग*, *दो दूनी चार* सारख्या शेकडो चित्रपटात बाजी मारून गेले.

स्त्रीवेशात कॉमेडी

*किस्मत*मध्ये विश्वजीतने घागराचोळी घालून 'कजरा मोहब्बत वाला...' गाणे गाऊन पडद्यावर धूम केली होती. या चित्रपटातले ते गाणे गाजल्यावर अनेक चित्रपटात हा प्रयोग करण्यात आला. *रफू चक्कर*मध्ये ऋषी कपूरने, *लावारिस*मध्ये अमिताभने, *जंगल में मंगल* चित्रपटात प्राण यांनी स्त्री वेष धारण करून लोकांना हसवले होते. नंतर संजय दत्त, गोविंदा, आमिर, सचिन असे कैकजण पडद्यावर स्त्रीवेशात आले. मात्र आज हा प्रयोग अगदीच बिभत्स वाटतो. अनेक कलाकारांनी पडद्यावर स्त्रीवेष धारण केला मात्र *चाची ४२०*मध्ये संपूर्ण चित्रपटभर स्त्रीवेशात वावरूनही कमल हासन बिभत्स दिसला नाही. ●